# 'भारतीयांची बुद्धिमत्ता वाढविते इतर देशांची संपत्ती!'

## ज्येष्ठ वैज्ञानिक रघुनाथ माशेलकर यांची खंत



एन.सी.एल.च्या आवारात उभारण्यात येणाऱ्या 'पॉलिमर अँन्ड अॅडव्हान्स मटेरियल' प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजन केंब्रिज विद्यापीठातील संशोधक प्रो. रिचर्ड फ्रेंड यांनी सोमवारी असे नारळ फोडून केले. त्या वेळी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या चेहऱ्यावरील स्मित लपून राहिले नाही.

**पुणे, १८ डिसेंबर / प्रतिनिधी**

भारतीयांच्या बुद्धिमत्तेमुळे आपल्या देशाऐवजी इतरत्र संपत्ती निर्माण होत असल्याची खंत वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केली. या बुद्धिमत्तेचा उपयोग भारतात संपत्ती निर्माण होण्यासाठी व्हायला हवा, अशी अपेक्षाही त्यांनी बोलून दाखवली.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या (एन.सी.एल.) 'इनोव्हेशन पार्क'तर्फे उभारण्यात आलेल्या 'व्हेंचर सेंटर'चे उद्घाटन केंब्रिज विद्यापीठाचे संशोधक व ख्यातनाम उद्योजक प्रो. रिचर्ड फ्रेंड यांच्या हस्ते आज झाले. त्या वेळी माशेलकर बोलत होते. एन.सी.एल.चे संचालक डॉ. एस. शिवराम, 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अॅन्ड रीसर्च'चे संचालक प्रो. के. गणेश, डॉ. व्ही. प्रेमनाथ हेही या वेळी उपस्थित होते. एन.सी.एल.च्या आवारात उभारण्यात येणाऱ्या 'पॉलिमर अॅन्ड अॅडव्हान्स मटेरियल'च्या नव्या प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजनही आज झाले. 'व्हेंचर सेंटर'द्वारे संशोधकांना उद्योजक बनविण्यासाठी सवलती उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

प्रो. फ्रेंड ज्याप्रकारे संशोधनातून उद्योजक बनले, त्यांच्याकडून भारतीय संशोधकांना नक्कीच प्रेरणा मिळेल, असा मुद्दा मांडताना माशेलकर म्हणाले की, पुण्यात उद्घाटन होत असलेल्या 'व्हेंचर सेंटर'मधून असेच शेकडो फ्रेन्ड निर्माण व्हावेत हा या केंद्राचा हेतू आहे. प्रत्यक्षात आज देशातील बुद्धिमत्तेचा इतर देशांनाच उपयोग होत आहे. अमेरिकेत सुमारे दोन लाख संगणक अभियंते काम करत आहेत, मात्र ते भारतात असे काम करू शकत नाही असे मानले जाते. कारण आशिया खंडात व प्रशांत क्षेत्रात तसे वातावरणच नाही, असेही सांगितले जाते. मात्र, चीनमध्ये हे वातावरण बदललेले पाहायला मिळते. भारतातही हे घडू शकते. भारतीयांच्या बुद्धिमत्तेमुळे आपल्या देशातच संपत्ती निर्माण व्हायला हवी आणि 'व्हेंचर सेंटर'मुळे हे प्रत्यक्षात येईल.

### 'संशोधकांसाठी मुक्त वातावरण'

वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेच्या संस्थांमधील संशोधकांसाठीचे नियम शिथिल करण्यात येत असून, त्याद्वारे त्यांना उद्योजक बनण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. जगात नवे बदल होत असताना अशा मुक्त वातावरणाची आवश्यकता आहे, असे माशेलकर यांनी सांगितले.

शासकीय संस्थांमधील संशोधनातून मिळणाऱ्या आर्थिक लाभाचा वाटा प्रत्यक्ष संशोधकांना देण्याच्या विधेयकाचा मसुदा मान्य झाला असून, तो लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळाकडे पाठविण्यात येणार आहे. येत्या दोन महिन्यांत त्यावर निर्णय होईल. त्याद्वारे देशातील संशोधन कार्याला मोठे प्रोत्साहन मिळणार आहे, अशी माहितीही या वेळी माशेलकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

शास्त्रज्ञांना तरुण वयातच संशोधनाबरोबर उद्योजक बनण्याची संधी उपलब्ध करून दिल्यास व त्यासाठी आवश्यकता असलेल्या सवलती दिल्यास अनेक संशोधक उद्योजक झालेले पाहायला मिळतील. मात्र, हे प्रत्यक्षात आणण्यासाठी व्यापक शिक्षणाची आवश्यकता आहे. यादृष्टीने 'व्हेंचर सेंटर' हे योग्य वेळी सुरू करण्यात आले आहे, असे मत प्रो. फ्रेंड यांनी व्यक्त केले.

'व्हेंचर सेंटर'चे फायदे लगेचच २-३ वर्षांत पाहायला मिळणार नाहीत, तर त्यासाठी काही काळ जावा लागेल. भविष्यात मात्र मागे वळून पाहिल्यावर त्याची उपयुक्तता लक्षात येईल, असे डॉ. शिवराम म्हणाले.